VOL- VII | ISSUE- I | JANUARY | 2020 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 6.293 | ISSN 2349-638x

# वर्तमान भारत आणि गांधीजीचे विचारमुल्य

डॉ. संगिता सोमवंशी

**सारांश :—**

*भारतीय राष्ट्रवादाचा आधार मानवतावाद असल्याचे संपूर्ण जगाच्या निदर्शनास आणून देणारे महात्मा गांधी हे श्रेष्ठ मानवतावादीच नसून ते सत्य, अहिंसा, सत्याग्रह आणि मानवी प्रेमाच्या अधिष्ठाणावर देशाचा स्वातंत्र्यलढा लढणारे आणि तो लढा यशस्वी करणारे जगाच्या इतिहासात याची नोंद घेण्यास भाग पाडणारे एकमेव महान विचारवंत, तत्वज्ञ होते. याच कारणास्तव संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठकीमध्ये १४३ देशांनी बहुमतांनी पाठींबा देवून २ ऑक्टोबर हा गांधीजींचा जन्मदिवस आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस म्हणून घोषित केला. ''अहिंसा परमो धर्म'', आजच्या दहशतवादाचे अहिंसेचे समर्थन करणाऱ्या तरूणांनी समजण्याची आवश्यकता आहे. आदर्श असा भावी नागरिक निर्माण करण्याकरिता तरूणांमध्ये विवेकनिष्ठा, आत्मनिर्भरता, संयम, शांती आणि शुद्ध चारित्र्य निर्मिती गांधीजींचे महत्वपूर्ण विचार रूजवायला पाहिजे.*

**प्रस्तावना :—**

आजच्या तंत्रज्ञानाच्या आधुनिक जगात अनेक संघर्ष घडत आहे. देशांतर्गत तसेच बाहेर जे संघर्ष होत आहे त्याची अनेक कारणांपैकी महत्वाचे कारण म्हणजे धर्मविरोधी संघर्ष. सर्व धर्म समभावाची आणि धार्मिक सहिष्णुतेची आजच्या अशांत झालेल्या मानवी जगाला शांततेने आणि सहकार्याने जीवन जगण्याची आवश्यकता आहे. याकरिता गांधीनी आयुष्यभर प्रयत्न केले. आजच्या तंत्रज्ञानामुळे जगाला एक खेड्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. याचा अर्थ आज मानवजात एकमेकांच्या अगदी जवळ आली आहे. आधुनिक दळणवळणाच्या सोयीमुळे एकमेकांच्या निकटच्या संपर्कात आली आहे. अशा युगात दंगे, हिंसात्मक वृत्ती वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे. याचा परिणाम म्हणून भारतीय सामाजिक स्वास्थ्य बिघडले आहे. आज गांधीच्या विचाराची, तत्वज्ञानाची अंमलबजावणीची म्हणजेच गांधीजीच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्याची आज खरी गरज निर्माण झाली आहे. आज देशाला जगाच्या प्रगतीच्या विकासाच्या शिखरावर घेवून यायचं असेल तर गांधीजींच्या सत्य आणि अहिंसा हा एकमेव मार्गच आपल्याला दिसून येईल.

**संशोधनाचा उद्देश :—**

१) गांधीजींच्या सत्य आणि अहिंसा मानवतावादी विचारधारेची होत असलेली पायमल्ली / अवमुल्यन अभ्यासणे.
२) गांधीजीच्या विचारांची प्रासंगिता तपासणे.
३) ग्रामीण विकासाबाबत गांधीजींच्या विचाराचा अभ्यास करणे.

**संशोधनाची पद्धती :—**

(प्रत्यक्ष निरिक्षण पद्धतीचा तसेच वर्णनात्मक पद्धतीचा वापर)

शोध निबंधाच्या सादरीकरणासाठी संशोधनकर्तीने प्रस्तुत विषयासबंधीत आधार सामुग्री संकलनासाठी व्दितीय साधनसामग्रीचा वापर केला असून संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके इत्यादिंचा वापर करण्यात आला आहे.

**गांधीजींच्या स्वप्नातील भारत आणि आजची वास्तवता :—**

विवेकानंदांनी धर्म कोणताही असो प्रत्येक मानवातील आत्मा हा सत्य आहे असे विचार मांडले होते. तेच विचार पूढे नेत गांधीजींनी सत्याग्रहाचा विचार मांडून पूढे नेला आणि जगाला मानवजातीकरिता शांततेचा संदेश दिला.

आज इंग्लंड, फ्रान्स आणि इतर युरोपातील राष्ट्रे तसेच युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका अणुयुद्धासाठी तयार असून मोठ्या प्रमाणात शस्त्राचा साठा करित आहे. त्यातच भर म्हणून भारत सुद्धा यात सक्षम झाला आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात युद्धे भडकली तर मानवसंहार होवू शकतो यापूढे जागतीक युद्धात सर्व मानवजात एकाच मार्गाने वाचू शकतो तो मार्ग म्हणजे गांधीचा विचार. महात्मा गांधीचा आध्यात्मिक मानवतावाद ही तत्वे मनपरिवर्तनासाठी मानव जातीला मिळालेली अलौकीक शक्ती आहे.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक गंभीर राजकीय, सामाजिक, आर्थिक समस्या निर्माण होत आहे. आर्थिक दरी, विषमता सुद्धा देशाच्या विकासाला बाधक ठरत आहे. असे सर्व गंभीर प्रश्न, समस्या सोडविण्यासाठी तसेच मानवतेच्या रक्षणार्थ अहिंसात्मक सत्याग्रहाचा मार्ग पर्याय म्हणून सांगता येईल.

तसे पाहिल्यास असे लक्षात येते की गांधीजींच्या सत्याग्रह, अहिंसा या संकल्पना एक व्यापक मानवतावादी तत्वज्ञानाचे अधिष्ठान आहे. कारण प्राचीन संस्कृतीमध्ये अहिंसेला फार महत्व दिल्या गेले. भागवत धर्म असो, बौद्ध, जैन धर्म असो त्यांनी अहिंसेलाच फार महत्व दिले. महाराष्ट्रात सुद्धा महान संतांची परंपरा राहिलेली आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव या सर्व महान संतानी तसेच वारकरी संप्रदाय महानुभाव पंथांनी सुद्धा अहिंसेचा पुरस्कार केलेल आहे. असा वारसा लाभलेल्या आपल्या भारत देशात दंगली, दहशतवादाचे सावट, समाजविघातक घटना मोठ्या प्रमाणात घडून येतांना दिसत आहे.

**कृतीयुक्त शिक्षण :—**

गांधीजींनी कृतीयुक्त शिक्षणाला रचनात्मक विधायक कार्यक्रमात महत्वाचे स्थान दिले. सुसंस्कृत व चारित्र्यसंपन्न व्यक्ती बनविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे शिक्षण होय. जीवनाचा उत्कर्ष साधण्यासाठी तसेच स्वत:चा सर्वांगीण विकासासाठी ज्या आदर्शाची व मुल्याची आवश्यकता असते त्याची शिक्षणाव्दारे जोपासना होते. कृतीयुक्त शिक्षणातून स्वालंबनाचे धडे देवून रोजगारक्षम, कौशल्यपूर्ण विद्यार्थी घडविण्याचे गांधींचे स्वप्न होते. परंतु आज परिस्थिती अशी निर्माण होत आहे की, आजचा तरूण आळशी होतांना दिसून येत असून तो गैरमार्गाला लागलेला आहे. विद्यार्थ्यांच्या हातात कलम ऐवजी हत्यारे दिसून येतात. त्यांना आपल्या मागण्या करिता मोठ्या प्रमाणात आंदोलने करावी लागतात. शैक्षणिक क्षेत्रात गुन्हेगारी वृत्ती, राजकारण, दडपशाही होतांना दैनंदिन घटनांवरून दिसून येते. दिल्लीमधील जवाहरलाल नेहरू विश्वविद्यापीठामध्ये शैक्षणिक क्षेत्रात राजकीय हस्तक्षेप मोठ्या प्रमाणामध्ये वाढल्यामुळे गांधीजींच्या स्वप्नातील भारत कसा निर्माण होईल हा प्रश्नच आहे. आजचा तरूण दिशाहीन होत असून तो ऐहिक आणि भौतीक सुखाला बळी पडतो आहे. सोशल मिडिया आणि इंटरनेटच्या महाजाळ्यात अडकून चैन विकासीवृत्तीला बळी पडत आहे. आभासी जगात वावरतांना त्याचा राष्ट्रवाद कमी होऊन राष्ट्रीय कर्तव्य आणि जबाबदारीपासून अलिप्त होत आहे.

**ग्रामीण विकास :—**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. म्हणूनच गांधीजींनी कृषीविकासाला फार महत्व दिले. कारण शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. शेतकरी सुखी तर देश सुखी याकरिता त्यांना जास्तीत जास्त सोयीसुविधा उपलब्ध करून द्यायला पाहिजे. देशातील अधिकाधिक उत्पन्न शेती व्यवसायातूनच मिळते. याकरिता 'खेड्यांकडे चला' आणि हस्तोद्योग, कुटिरोद्योग, शेतउद्योग ला प्राधान्य देवून व्यवसायामुख प्रशिक्षणातून प्रगतीची संकल्पना गांधीजींनी मांडली होती. १९२० चा असहकार आणि

स्वदेशी आंदोलन तसेच खादीच्या प्रयोगाने ग्रामीण आत्मनिर्भरता आणि आत्मविकास होण्यास महत्वपूर्ण भूमिका आहे. गांधीजींनी रामराज्य, ग्रामराज्याची कल्पना स्पष्ट करतांना म्हटले की खेडी जेव्हा स्वयंशासीत व स्वयंपूर्ण होतील तेव्हाच ग्रामस्वराज्य खऱ्या अर्थाने निर्माण होईल. आदर्श समाजाची निर्मिती करिता ‘ग्रामस्वराज्य’ हि एक पायरी आहे. सन १९१५ साली दक्षिण आफ्रिकेतून जेव्हा गांधीजी भारतात परतले तेव्हापासून त्यांनी ग्रामपंचायती गरज आणि त्यातून निर्माण होणारी ग्रामविकासाचे महत्व पटवून दिले होते. कारण या पंचायतीमार्फत आर्थिक, सामाजिक, राजकीय प्रश्न असो की समस्या सोडविल्या जावून तेथे एक आदर्श ग्रामराज्य निर्माण होईल. परंतु आजची परिस्थिती फार विचित्र अशा वळणावर आहे. महत्मा गांधीच्या नावावरून अनेक ग्रामीण योजना राबवून म. गांधीजींचे स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न केला जात असला तरी पाहिजे तसा ग्रामीण विकास होऊ शकला नाही. ग्रामीण तरूण शहरीकरणाकडे वळत आहे. बेरोजगारांची संख्या वाढत आहे. खेडे ओसाड होत आहे. मॉल आणि ई—कॉमर्स मुळे शेतकऱ्याचा व्यवसाय ठप्प झाला आहे. शेतकरी कर्मबाजारी होऊन शेतकरी आत्महत्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

**धार्मिक तसेच झुंडशाहीला गांधीवाद हेच उत्तर**

भारताचा स्वातंत्र्य लढा लढतांना त्यांनी आपल्या कार्यक्रमात हिंदू—मुस्लीम ऐक्याचे तत्व अंगिकारले. भारतात सर्वधर्म पंथाचे लोक शांततेने राहावे आणि त्यांच्यामध्ये बंधूभाव राहावे याकरिता गांधीजींनी सर्वधर्मसमभाव निर्माण करण्याकरिता सर्वधर्मप्रार्थनेला महत्व दिले. हिंदू मुस्लीमातील व्देष समाप्त करण्यासाठी त्यांनी आमरण उपोषण केले होते. आणि त्यांच्यातील ऐक्याकरिता शेवट पर्यंत प्रयत्न केले. देशाचा विकास करायचा असेल तर सर्व जाती, धर्म पंथातील लोकांमध्ये ऐक्य असायला पाहिजे. परंतु आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात लोक एकमेकांच्या अधिक जवळ येवून संपर्कात आहे. परंतु आज देशात भाषावाद, जातीवाद, प्रादेशिकवाद, धार्मिक संघर्ष, तणाव इत्यादिमुळे व्देषभावना निर्माण होवून लोकांमध्ये, समाजामध्ये, देशामध्ये ऐक्याची भावना कमी होत आहे. देशात शांतता सामंजस्य, ऐक्य, बंधूभाव या गांधीजींच्या मुल्यांची, विचारांची खरी असल्याचे जाणीव निर्माण होत आहे.

**समाजकारणातून राजकारण :—**

गांधीजी एक धुरंदर राजकारणी होते. त्यांनी देशातील अत्यंत कर्तबगार तसेच राष्ट्रवादाची जाण असणाऱ्या व्यक्तींना जमवून राजकारण केले. त्यांचे राजकारण नैतिकता आणि अध्यात्मीकरणावर आधारलेले होते. राजकारण करतांना राजकीय नेत्याने जनसेवा हिच ईश्वरसेवा मानुन मानवी गुणांची, मुल्याची जोपासना करून सामाजिक समता व न्याय यावर अधिक भर दिला. हिंसेला अहिंसेने आणि व्देषाला प्रेमाने देता येते हे त्यांनी सत्याग्रही मार्गाव्दारे भारताला तसेच जगाला दाखवून दिले. राजकारणात ते अधिक गुंतून राहत नसे ते सतत कार्यकर्त्यांना विविध अशा विधायक कार्यात गुंतवून ठेवत. याच कारणामुळे सामाजिक परिवर्तन आणि स्वातंत्र्य चळवळ एकत्र राबवून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले.

आजची परिस्थिती मात्र वेगळी आहे. आजचा राजकारणी हा फक्त निवडणूक डोळ्यासमोर ठेवून राजकारणात उतरतो आहे. सामाजिक कार्यात सुद्धा राजकारण करण्यातच आजचे राजकीय लोक स्वार्थ साधतांना दिसून येतो. व्देषाचे राजकारण आज होतांना दिसून येते. राजकारणाचे गुन्हेगारीकरण होत आहे. धर्मनिरपेक्षता हे तत्व बाजूला पडून धार्मिक व्देष लोकांमध्ये पसरविण्यातच राजकारणी धन्यता मानत आहे. जातीपातीचे राजकारण करून लोककल्याणकारी राज्याची निर्मिती हि संकल्पना

सुद्धा मागे पडत आहे. विद्यार्थी असो विद्यापीठ, सर्व शैक्षणिक क्षेत्रात राज्यकर्ते राजकारण करून लोकांच्या भावना भडकाविण्याचे काम करतांना दिसून येते. गांधीजींच्या आदर्शमुल्यांची पायमल्ली होतांना दिसून येत आहे. गांधीजींचा आजचे राज्यकर्ते आपल्या स्वार्थासाठी वापर करित आहे. असे निदर्शनास येत आहे. खऱ्या अर्थाने देशाचा विकास करायचा असेल तळागाळातला माणूस हाच लक्ष ठेवून देशसेवा करणे हाच मुख्य उद्देश्य राजकारणाचा असायला पाहिजे तरच गांधीजींना अभिप्रेत असलेला भारत निर्माण करता येईल.

**निष्कर्ष :—**

महात्मा गांधी हे एक युगपुरूष ज्यांनी जगाला मानवतावादाची, सत्य अहिंसेची शिकवण दिली. ते भारतातील राजकारणात सक्रीय असतांनाही धर्म आणि राजकारणाचा समन्वय साधला. याच समन्वयातून आपले नैतिक मुल्य जपत त्यांनी स्वातंत्र्याची लढाई यशस्वीपणे जिंकली. गांधीजींच्या विचारप्रेरणेतून निर्माण झालेल्या 'पंचायतराज' या यशस्वी प्रयोगामुळे देशातील गावाचा विकास होत असतांना दिसून येत आहे. सामाजिक कार्य असो की राजकारण असो जिवनाच्या शेवटपर्यंत त्यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांनी जागतिक स्तरावर एक वेगळीच छाप निर्माण केली. त्यामुळेच आजही संपूर्ण जग त्यांच्या आदर्श, मुल्यावर वाटचाल करण्याचा प्रयत्न करित आहे. ग्रामस्वराज्य, ग्रामोद्योग असो की पर्यावरण, आरोग्य, व्यक्तिगत आचरण, राहणीमान सर्वधर्मसमभाव असो अशा एक नव्हे तर अनेक विषयांबाबतचे त्यांनी मांडलेले मते, विचार आजही आधुनिक काळात सुसंगत असल्याचे दिसून येते. गांधीजींच्या सर्वसामान्यांसाठीचा न्याय हक्कासाठीचा लढा असो की चंपारण्य, खेडा सत्याग्रह, दक्षिण आफ्रिकेतील संघर्ष, स्वातंत्र्य संग्रामातील संघर्ष, भारत छोडो आंदोलन हे सर्व संघर्ष आणि त्यामध्ये त्यांना मिळालेले यश, त्यांचा त्याग, कर्तृत्व यातून आपल्याला सतत प्रेरणा देत राहिल.

आज देशात समाजात हिंसक प्रवृत्ती वाढत चाललेली आहे. दहशतवादाचे समर्थन करणारे विघटनवादी, देशविभाजन करायला निघालेले मानवी मुल्यांची पायमल्ली करणारे लोक तरूणांमध्ये संभ्रमावस्था निर्माण करीत आहे. देशाच्या एकात्मतेत व अखंडतेत बाधा आणण्याचा प्रयत्न करित आहे. अशावेळी आजच्या तरूणांनी सत्य जाणून डोळसपणे पाहण्याची गरज आहे. गांधीजींचे आचार विचार दुधारी तलवार आहे. ज्यामुळे दहशतवादी विचारांचे नायनाट करून जगात शांतता प्रस्थापित करता येईल. देशाच्या वर्तमान स्थितीचा विचार केला असता देशाची एकता व अखंडता कायम राखण्याच्या हेतूने म. गांधींचे आचार व विचार आजही निश्चितपणे सहाय्यक ठरतील असे मी पूर्ण विश्वासाने सांगू इच्छिते.

**संदर्भसुची :—**

१) भोळे, भा. ल. — भारतीय राजकीय विचारवंत, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.
२) पाटील, वि. वि. — भारतीय राजकीय विचारवंत, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
३) पन्त, डी. सी., कॉलेज बूक डिपो, जयपूर, २०११.
४) देशपांडे सरोज (अनु.), ''महात्मा गांधी यांचे राजकीय चरित्र, डायमंड पब्लिकेशन, २००७.